**दिनांक: 27/ 02 /25**

## विषय : सोसायटी आणि बिल्डर मधे होणाऱ्या डेव्हलपमेंट अँग्रीमेंट या ड्राफ्ट वर चर्चा.

दिनांक 25/02/25 रोजी सोसायटी सभासदांचा एक मेळावा, सोसायटी आणि बिल्डर यांच्या मधे आपल्या पुनर्निर्माण प्रकल्पात ज्या डेव्हलपमेंट अँग्रीमेंट वर सह्या होणार आहे त्याचा मसुदा सभासदांना कळावा व त्यांच्या कडून ह्या मसुद्यसंबंधी काही सूचना असल्यास त्याची नोंद घ्यावी, ह्या उद्देशाने सोसायटी च्या सभागृहात भरविण्यात आला. श्री विजय सावंत अध्यक्ष स्थानी होते.

ह्या मेळाव्याला संस्थे चे 49 सभासद आणि कुटुंबीय उपस्थित होते. मेळाव्यात आपले प्रकल्प सल्लागार श्री हर्षल कवडिकर आणि विधी सल्लागार ऍड किरण काबरा हे ही उपस्थित होते.

श्री सावंत यांनी उपस्थितांचे स्वागत करून मेळावा घेण्याचा उद्देश्य सांगितला तर सचिव श्री पटवर्धन यांनी डी ए ड्राफ्ट वर मागल्या 3/4 महिन्यात सल्लागार, बिल्डर आणि पंच समिती ह्यांच्यात सखोल चर्चा होऊन डी ए ड्राफ्ट फायनल स्टेज ला आल्या चे सांगितले.
ऍड. काबरा यांनी ड्राफ्ट वर सखोल माहिती दिली तसेच काही सभासदांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना पण उत्तरं दिली. ह्या चर्चेत सभासद श्री श्रीवर्धन गाडगीळ, ऍड. किशोर जकाते, ऍड. अमोल जोग आदींनी भाग घेतला.

मेळाव्यात असे ठरविण्यात आले की असलेल्या संयुक्तिक सूचनांचा विचार करून विधी सल्लागार revised ड्राफ्ट सोसायटी ला लगेच देतील आणि त्यावर सभासदांची मंजुरी घेण्यासाठी दिनांक 02/03/25 ला सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा घेण्यात येईल.

अध्यक्ष श्री सावंत यांनी सर्वांचे आभार मानून मेळावा संपल्याचे जाहीर केले.

पंच समिती